# प्रकरण सातवे

## "उपसंहार"

## प्रकरण सातवे

## उपसंहार

भारतीय समाजाने धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार पुरूषार्थ मानले आहेत. या पुरूषार्थाची प्राप्ती करून घेताना व्यक्तीला स्त्रीचे सहकार्य लागतेच. तसेच स्त्री ही देखील व्यक्ती आहे. ती देखील पुरुषाप्रमाणे पुरूषार्थाची प्राप्ती करून घेऊन शकते. भारतीय समाजाचा स्त्री हा महत्त्वाचा घटक आहे. म्हणून धर्मशास्त्रपर वाङ्मयात तत्कालीन स्त्री जीवनाचे प्रतिबिंब पडले आहे. त्यामुळे धर्मशास्त्रपर वाङ्मयाचा भाग म्हणून प्रसिद्ध असलेल्या स्मार्त वाङ्मयातील याज्ञवल्क्यस्मृतीमध्ये प्रतिबिंबित झालेल्या स्त्री जीवनाचा चिकित्सक अभ्यास करण्याचा उद्देश दृष्टीसमोर आहे. असा अभ्यास हल्लीच्या समाजास, विशेषतः स्त्रियांना आपल्या प्रगतीच्या दृष्टीने उपयुक्त होईल असे संशोधिकेस वाटतो.

चतुर्विध पुरूषार्थापैकी "धर्म" हा प्रथम पुरूषार्थ मानला जातो. धर्माबाबत प्राचीन आणि आधुनिक विचारवंतांनी पुष्कळ चर्चा केली आहे. धर्मामध्ये मानवाचे कल्याण आणि विकास या गोष्टी अभिप्रेत आहेत. धर्म ही सतत बदलणारी क्रिया आहे. तथापि याबाबत मला वाटते- "धर्म म्हणजे स्थलकालसापेक्ष तारतम्याने विवेकाचे आचरण."

समाजातील उच्छृङ्खल वर्तनाचा बीमोड करून सुस्थिरता प्रस्थापित करण्यासाठी संस्कारयुक्त शिक्षणाची आवश्यकता आहे.

भारतीय समाजाचे स्त्री हे महत्त्वाचे अंग आहे. तेव्हा याज्ञवल्क्यस्मृतीमधील स्त्री-जीवनाच्या विविध अवस्था, तिचे अधिकार इ.संबंधी चिकित्सा करण्याचा प्रस्तुत लघुशोधनिबंधाचा हेतू आहे.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

या लघुशोधनिबंधाच्या द्वितीय प्रकरणामध्ये स्त्रीचे बालपण आणि शिक्षणासंबंधीचे विचार "स्त्री-गर्भाधान ते उपनयन संस्कार" या शीर्षकाच्या अंतर्गत मांडले आहेत·

धर्मशास्त्राच्या काळात संस्कारांना अतिशय महत्त्व होते· संस्कारांमुळे व्यक्तिमत्त्व फुलण्यास मदत होते, असे मानले जात असे· म्हणून स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाचा विचार करीत असताना तिच्यावरील संस्काराचा विचार करणे महत्त्वाचे आहे·

गर्भाधान, पुंसवन इ·संस्कार विवाहित स्त्रीवर होतात· पण त्यात विचार गर्भाचा असतो· तो गर्भ पुरुष की स्त्रीचा हे त्या काळात समजत नव्हते तरी, तो पुत्र असावा या कामनेने स्त्रीवर केले जात· म्हणजे त्या संस्कारातून स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास अभिप्रेत नसून गर्भस्थ पुरुषाचा विकास अभिप्रेत आहे·

याज्ञवल्क्यस्मृतीने स्त्रियांच्या बाबतीत विवाहाखेरीज सर्व संस्कार अमंत्रक सांगितले आहेत· म्हणजेच स्त्रीचे उपनयन हेही अमंत्रक· उपनयनाच्या ऐवजी विवाह संस्कार मानल्याने उपनयन नाकारले· पर्यायाने शिक्षणही नाकारले· म्हणजेच एकंदरीत तिचे व्यक्तिमत्त्व खुंटविण्यासारखे होय·

विवाहानंतर स्त्री समागमाविषयी सांगितलेले सर्व संस्कार स्त्रीच्या पोटी पुत्र जन्मावा या कामनेनेच केलेले आहेत· तिला मुलगी व्हावी असा विचार कोठेच आढळत नाही· या ठिकाणी स्त्री म्हणजे पुत्र निर्मितीची व्यक्ती किंवा साधन याहून तिला महत्त्व नाही· "क्षेत्र" हेच केवळ तिचे स्वरूप आहे·

तेव्हा या संस्कारांनी स्त्रीला काही अधिकार दिले असे म्हणता येणार नाही·

तृतीय प्रकरणामध्ये स्त्रीच्या वैवाहिक जीवनासंबंधीत बाबींचा विचार केला आहे·

उपनयनाच्या जागी विवाह संस्कार मानल्याने आणि इतर उल्लेखांवरून साधारणपणे मुलीच्या बाबतीत 8 ते 14 वर्षे हे विवाहयोग्य वय असल्याचे याज्ञवल्क्याच्या प्रतिपादनावरून वाटते·

वधू निवडीसाठी आंतरिक लक्षणे जाणण्याच्या उद्देशाने आश्वलायन गृह्यसूत्रातील पिंडपरीक्षेचा आधार याज्ञवल्क्यस्मृतीने घेतला आहे· याप्रमाणे एखाद्या मुलीच्या भविष्याचे अनुमान काढणे अन्याय्य आणि अंधश्रद्धेला खतपाणी घालणारे वाटते· वधूची बाह्य लक्षणे

जाणण्यासाठी अनन्यपूर्विकां, भ्रातृमतीं, अरोगिणीं इ·अटी घातल्या आहेत· यावेळी आई-वडिलांच्या कुळांचाही विचार केला जात असे· सपिंड, सगोत्र, विवाहाला याज्ञवल्क्याची मान्यता नसल्याचे दिसते· काही अटी मान्य करता, आदर्शवादाच्या दृष्टीने योग्य वाटल्या तरी प्रत्यक्षात त्यांचे तंतोतंत पालन करणे कठिण वाटते·

गुणसंपन्न अशा वधूला शोभणारा वर असावा· यासाठी वरालाही वेदाध्ययनसंपन्न सत्कुलातील असावा इ·अटी सांगितल्या आहेत·

विवाहाचे ब्राह्म, दैव इ·आठ प्रकार सांगितले आहेत· त्यामध्ये सद्यस्थितीत ब्राह्म विवाह अस्तित्वात असल्याचे दिसते· प्राजापत्य विवाह थोडयाफार प्रमाणात आणि वधू-वरांच्या परस्पर संमतीने होत असलेला गांधर्व विवाह ज्याला आपण प्रेमविवाह म्हणतो, हा अस्तित्वात असल्याचे आढळते· एकतर्फी प्रेमातून आसूर विवाह घडल्याचे आपण ऐकतो·

विवाहप्रकारातून निर्माण झालेली संतती मागील व पुढील मातृ-पितृ वंशावर परिणाम करणारी ठरते, असे याज्ञवल्क्यस्मृतीने प्रतिपादन केले आहे· तथापि ही संतती मागच्या पिढीपेक्षा पुढील पिढीवर परिणाम करणारी ठरते, असे वाटते·

विवाह विधीप्रसंगी याज्ञवल्क्याने सवर्ण आणि असवर्ण वधू यांच्यामध्ये भेद केलेला दिसतो· वर्णाचे प्रतीक असलेल्या बाणासारख्या गोष्टींना या ठिकाणी महत्त्व दिले आहे·

कन्यादान अधिकाराची चर्चा करीत असताना याज्ञवल्क्याने हा अधिकार सर्वप्रथम पित्याला, नंतर आजोबा, बंधू, पितृकुलातील व्यक्ती याप्रमाणे एकाच्या अभावी दुस-याला आणि सरतेशेवटी का होईना मातेला दिला आहे· रजोदर्शनापूर्वी मुलीचा विवाह व्हावा अन्यथा पित्याला भ्रूणहत्येचे पातक लागते, असे म्हटले आहे· मिताक्षरेने याबाबत व्यक्त केलेले मत लक्षणीय वाटते कारण विशिष्ट कालावधीनंतर मुलीला वर निवडण्याचे स्वातंत्र्य दिले आहे·

कन्यादानाबाबत सांगत असता याज्ञवल्क्यस्मृतीने महत्त्वपूर्ण सवलत दिली आहे की, सप्तपदीपूर्वी , केवळ वाङ्निश्चय झाला असेल तर प्रथम स्थळापेक्षा वरचढ स्थळ मिळाल्यास असा ठरलेला विवाह मोडता येतो·

कन्येच्या ठिकाणी असणा-या दोषांची स्पष्ट कल्पना वरपक्षाला न दिल्यास त्याबाबत दंडयोजना सांगितली आहे.

निर्दोष स्त्रीचे "अधिवेदन" करणे या स्मृतीला संमत नाही. अधिवेदन केलेल्या स्त्रीच्या पोषणाची जबाबदारी पतीवर सोपवून एकप्रकारे तिला आधार प्राप्त करून दिला आहे.

स्त्री कर्तव्यासंबंधी सांगत असता याज्ञवल्क्याने तिच्याकडून काही वास्तव तर काही अवास्तव यापेक्षा गृहीत धरल्याचे जाणवते. पतिवचन मानणे हा स्त्रीचा "परमधर्म" असल्याचे म्हटले आहे. मात्र आदर्श गृहिणीच्या संबंधात व्यक्त केलेल्या अपेक्षा चांगल्या संस्कृतीचे द्योतक वाटतात.

स्त्री ही रक्षणीय व उपभोग्य आहे. याचे कारण म्हणून प्रजोत्पादनाद्वारे वंशसातत्य आणि स्वर्गप्राप्ती हे सांगून स्त्रीला आपल्या उद्दिष्टपूर्तीचे माध्यम बनविले असल्याचे जाणवते.

रजस्वलेने पालन करावयाच्या नियमामध्ये तिच्या नैसर्गिकधर्माचा विचार न करता अपवित्र मानले आहे.

स्त्री कुटुंबाचा आधारस्तंभ असल्याने तिच्या प्रसन्नतेच्या, अपेक्षापूर्तीच्या दृष्टीने पती, सासू, सासरे इ.कुटुंबियांनी तिचा सन्मान करावा, हे या स्मृतीचे मत उल्लेखनीय वाटते.

प्रोषितभर्तृकेसाठी सांगितलेले नियम अयुक्त वाटत असले तरी, समाजातील व्यक्तींनी त्याचा गैरफायदा घेऊ नये, इ.नैतिकतेच्या दृष्टिकोनातून मांडलेले दिसतात.

"रक्ष्" धातूच्या अर्थातील सत्ता गाजविणे इ.अर्थ उत्तरकाळात प्रभावी ठरले. परिणामस्वरूप मनुस्मृतीतील व याज्ञवल्क्यस्मृतीतील या वचनांचे अर्थ विपरीत होऊ लागले. स्त्रीला स्वातंत्र्य देऊन चालणार नाही, तिला ताब्यातच ठेवली पाहिजे, असा विचारप्रवाह सुरू झाला. मूळ स्मृतींना हे कितपत अभिप्रेत होते. हे निश्चित सांगता येणार नाही. परंतु पुढे पुढे या स्मृतिवचनांच्या आधारे स्त्री समाजाचे स्वातंत्र्य धोक्यात आल्याचे चित्र दिसून येते.

विधवा स्त्रीने कोणाच्या तरी आश्रयाने राहावे, निर्दोष किंवा अव्यभिचारी जीवन जगावे हे याज्ञवल्क्यस्मृतीचे मत वावगे वाटत नाही· तथापी मिताक्षरेने सती-प्रथेचे केलेले समर्थन निश्चितच धक्कादायक वाटते·

याज्ञवल्क्यस्मृतीला पुनर्विवाह मान्य नसल्याचे दिसते· मात्र पुरूषाने स्त्रीच्या मृत्यूनंतर "विनाविलंब" काही लंगडया सबबींवरून विवाह करावा हे मत स्त्रीवर अन्याय करणारे वाटते·

नियोगाची चर्चा याज्ञवल्क्यस्मृतीने केली आहे· हा कलिवर्ज्य मानला आहे· नियोगामुळे स्त्रीला फायद्यांप्रमाणे तोटेही संभवू शकतात· नियोग हा जीवनामध्ये आधार म्हणून स्वीकारायला हरकत नाही· समाजातून उठण्यापेक्षा पुत्रवती म्हणून जगणे केव्हाही योग्य। तथापि स्त्रीच्या इच्छेविरूध्द जबरदस्तीने नियोगाच्या भरीस घालणे योग्य नव्हे·

व्यभिचारी स्त्रीसाठी तिला केलेल्या कृत्याबद्दल पश्चात्ताप व्हावा या हेतूने काही निकृष्ट जीवन तिच्यासाठी सांगितले असले तरी तिच्या पोषणाची जबाबदारी मात्र टाळलेली नाही· त्यामुळे अशा स्त्रीबाबत त्याचा सहानुभूतीचा दृष्टिकोण दिसतो·

स्मृती ग्रंथांनी समाजातील विविध घटकांच्या हक्कांविषयी, कर्तव्यांविषयी महत्त्वपूर्ण विचार मांडले आहेत· याज्ञवल्क्यस्मृतीने "स्त्री"घटकाच्या सामाजिक अधिकाराबाबत आणि धार्मिक नियम इ·बाबत जे विचार मांडले आहेत, ते चौथ्या प्रकरणात आले आहेत·

गृहस्थाने स्ववासिनी कन्या, गर्भवती स्त्री यांना व्यवस्थित भोजन द्यावे, माता व मातृसंबंधी बांधवांचे भोजनाच्याद्वारे आदरातिथ्य करावे, स्त्रीला रस्त्यामध्ये जाण्यासाठी मार्ग द्यावा इ·स्त्री बाबत आदर दाखविणारे नियम सांगितले आहेत·

श्राद्धप्रसंगी मातेचे सपिंडकरण करावे, मातामहादिकांस उद्देशून स्वधाकार म्हणावा असे म्हटले आहे· श्राद्धाच्या अक्षय फलप्राप्तीचे हेतू सांगत असता, माता इ·ची सेवा करणारे ब्राह्मण श्राद्धविधी करण्यास योग्य तर, पुनर्भूपुत्र इ·ब्राह्मण अयोग्य म्हणून सांगितले आहेत·

न्यायालयामध्ये "स्त्री" साक्षी होत नसल्याचे प्रतिपादन केल्याने याज्ञवल्क्याने हा अधिकार नाकारल्याने स्त्रीवर मोठा अन्याय केला आहे·

दिव्याच्या वर्णनप्रसंगी स्त्रियांसाठी तुला दिव्य सांगितले आहे·

दत्तप्रदानिक प्रकरणामध्ये स्त्री ही अदेय आहे· म्हणजे तिच्यावर पुरूषाचे स्वामित्त्व असले तरी दानाच्या स्वरूपात तिचा व्यवहार करता येत नाही, असा महत्त्वपूर्ण मुद्दा या स्मृतीने मांडला आहे·

वाक्यपारूष्य चर्चेप्रसंगी स्त्रीवाचक अश्लील बोलणा-यास दंडयोजना सांगितली आहे·

पत्नीला मारणे, नियोगाशिवाय विधवेशी गमन करणे, दासीगर्भाची हत्या, इ·स्त्री अत्याचाराला साहस मानून त्यासाठी प्रथम, मध्यम व उत्तम या स्वरूपाचा दंड सांगितला आहे· यावरून तत्कालीन न्याय व्यवस्थेची कल्पना आपल्याला येते·

स्त्रीचा समावेश उत्तम द्रव्यामध्ये करून या स्तेयाबद्दल उत्तमसाहस रूपाचा दंड सांगितला आहे· गर्भपात, स्त्रीवध हे करणा-या पुरूषासाठी दंडयोजना केली आहे· तद्वतच दोषी असलेल्या स्त्रीला देखील यातनाकारक मृत्युदंडाची शिक्षा सांगितली आहे· तथापि गर्भवतीला मात्र या शिक्षेत सूट देऊन याज्ञवल्क्याने सहानुभूतीचा दृष्टिकोण स्वीकारलेला दिसतो·

गुणहीन व विद्याहीन माता, भगिनी इ·ना यथाशक्ती दान देणे हे उत्तम कर्म मानले आहे कन्यादान हे पवित्र मानून केवळ पुत्रच पित्याचा उद्धार करतो, असे नव्हे तर कन्या पती कुळात राहूनही पित्याचा उद्धार करू शकते ही महत्त्वाची बाब या ठिकाणी सांगितली आहे·

स्त्री किंवा स्त्रीधनासारख्या गोष्टींच्या दानाने पुण्यप्राप्ती होण्याऐवजी पापप्राप्ती होत असल्याचे "अदेय" दानाच्या चर्चेतून ध्यानात येते·

राजधर्माविषयी सांगत असता रणांगणावर स्त्री अवध्य असल्याचे म्हटले आहे· तसेच राजाने स्त्रीचे रक्षण करावे अशा प्रकारचा नियम मांडून स्त्री विषयीची दखल घेतलेली दिसते·

धार्मिक कृत्यांमध्ये याज्ञवल्क्याने ज्येष्ठ सवर्ण स्त्रीचा सहभाग महत्त्वपूर्ण मानल्याने असवर्ण व इतर सवर्ण स्त्रियांवर अन्याय झाल्याचे दिसते·

UNIVERSITY

याज्ञवल्क्यस्मृतीने स्त्रियांचा संपत्तीतील वारसा, स्त्रीधन इ. अधिकाराबाबत काही महत्त्वाच्या बाबी मांडल्या आहेत. "स्त्रियांच्या बाबतीतील आर्थिक अधिकार" या पाचव्या प्रकरणामध्ये यासंबंधीचा विचार केला आहे. मिताक्षराप्रमाण मानून न्यायदान करणा-या राज्यात ह्यातील काही नियम स्त्रियांच्या दृष्टीने हितकारक ठरले आहेत.

दायविभाग या मुद्याची चर्चा चालू असता पत्नी, माता, कन्या, भगिनी, गर्भवती स्त्रीच्या संततीचा देखील विचार याज्ञवल्क्यस्मृतीने करून त्यांच्या आर्थिक अधिकाराबाबतीतील महत्त्वपूर्ण असे नियम मांडले आहेत.

पतीने आपल्या हयातीत संपत्तीची विभागणी केली असता, पुत्राच्या समान हिस्सा पत्नीला द्यावा, असा नियम सांगितल्याने पतीच्या पश्चात पत्नीला आर्थिकदृष्टया आधार प्राप्त झाला आहे. पित्याच्या मृत्यूनंतर पुत्रांच्या संपत्ती विभागणीप्रसंगी मातेला पुत्राच्या इतका हिस्सा मिळतो. अपरार्कानि सापत्न मातेलाही हा हिस्सा मिळतो. असे म्हटले आहे, या नियमाने वैधव्यावस्थेतील स्त्रीची आर्थिक निकड भागू शकणार आहे. पुत्ररहित पित्याच्या धनाची विभागणी करीत असता वारसांचा क्रम याज्ञवल्क्याने सांगितला आहे. विधवेचा देखील विचार करणा-या या स्मृतीने तिला उपकृत केले आहे असे वाटते. धनाची विभागणी झाल्यानंतर मागे बहीण वगैरे असेल तर तिच्या विवाहाची तरतूद भावंडानी आपल्या अंशातील चौथा अंश देऊन करावी असाही नियम करून अविवाहित कन्येच्या जीवनाचा विचार केलेला दिसतो. नपुंसक, क्लबत्व असलेल्या व्यक्तींचे वाटपासंबंधी आणि वारसा हक्कासंबंधीचे हक्क काढून घेतले तरी अशा व्यक्तींच्या कन्यांना पोषणाचा, विवाहाची तरतूद करून घेण्याचा हक्क असल्याचे, त्याचप्रमाणे निर्दोष वर्तनाच्या स्त्रियांच्या पालनपोषणासंबंधीचे प्रतिपादन याज्ञवल्क्यस्मृतीने केले आहे.

स्त्रीधनाविषयी सांगत असता त्यामध्ये अंतर्भूत होणा-या वस्तू, स्त्रीधनाचा वारसा, स्त्रीधनावरील सत्ता या तीन मुद्यांची चर्चा केली आहे. ब्राह्म इ. चार मान्य प्रकारचा विवाह असेल तर अपत्यहीन स्त्रीचे धन पतीकडे जाते, तर अपत्यवतीचे धन दुहितृचे होते. इतर चार प्रकारचा विवाह असेल तर ते धन पितृगामी होते, असे म्हटले आहे. पतीला आपल्या पत्नीच्या स्त्रीधनाचा उपयोग काही विशिष्ट अडचणीच्या वेळी करता येतो, तशा स्थितीत ते धन परत करण्याची जबाबदारी त्याच्यावर नसते. यावरून संकटाव्यतिरिक्त अन्य परिस्थितीत घेतलेले स्त्रीधन परत करण्याची जबाबदारी पतीवर टाकल्याची दिसते. अधिवेदन केल्यानंतरही प्रथम पत्नीची जबाबदारी न झटकता उलट

... KAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

भरणपोषणाची, तिला स्त्रीधनाचा भाग देण्याचा विचार याज्ञवल्क्यस्मृतीने मांडला आहे· अशा प्रकारच्या स्त्री संबंधीत बाबींचा याज्ञवल्क्याने किती खोल विचार केला होता ते यावरून आपल्या लक्षात येते·

स्त्रीधनावर काही मर्यादा होत्या, असे विचारवंतांचे म्हणणे मान्य करूनही हिंदू संस्कृतीमधील ही एक अभिमानस्पद बाब असल्याचे दिसते, आर्थिकदृष्टया दुर्बल असलेल्या स्त्रीला आधार प्राप्त होत होता ही या स्मृतीतील उल्लेखनीय बाब आहे· स्त्रीधनाची ही परंपरा कायम राहणे आवश्यक आहे, असे वाटते·

सहाव्या प्रकरणामध्ये "स्त्री-संग्रहण, त्याबद्दल शासन, प्रायश्चित्त इ·संबंधी विचार केला आहे· याज्ञवल्क्यस्मृतीने देखील अन्य धर्मशास्त्रांप्रमाणे स्त्री-पुरुष संबंधाची चर्चा अतिशय सूक्ष्मपणे केली आहे· हे परस्परांतील संबंध शुद्ध स्वरूपाचे राहावेत, अशाप्रकारचा स्मृतिकारकांचा आग्रह दिसतो· हे संबंध बिघडल्यास त्याचा परिणाम स्त्री-जीवनावर आणि पर्यायाने समाजावर होत असतो· तेव्हा अशा संबंधाला बाधा निर्माण करणा-या पुरुषाला व स्त्रीलाही जबाबदार मानून याज्ञवल्क्यस्मृतीने शिक्षा सांगितल्या आहेत·

स्त्री-संग्रहणाचे तीन प्रकार सांगून त्या बाबतच्या शिक्षा सांगितल्या आहेत· ही शिक्षा त्या अपराधाशी संबंध असलेला पुरुष आणि स्त्री यांची जात, ती स्त्री विवाहित की अविवाहित होत, ती स्त्री संरक्षित की असंरक्षित होती, याला अनुसरून भिन्न सांगितली आहे· ही शिक्षेबाबतची व्यवस्था भेदावर आधारित दिसते· अपराधाबाबत सर्वांना समान शिक्षा असणे आवश्यक आहे· कन्येचा अपहार केल्याबद्दल, तिला नसलेल्या दोषांनी दूषित केले असता इ·स्त्री संग्रहणाबाबत प्रथम साहस दंडापासून ते करच्छेद, वधापर्यंत अत्यंत कडक शिक्षा सांगितल्या आहेत·

रखेली स्त्रियांचे अवरुद्धा व भुजिष्या असे दोन प्रकार सांगितले आहेत· आज आपण समाज बहिष्कृत म्हणून मानत असलेल्या या स्त्रियांच्या संग्रहणाबाबतही याज्ञवल्क्यस्मृतीने दंडयोजना सांगितली आहे· वेश्या व्यवसायावर उदरनिर्वाह करणा-या अशा स्त्रियांना मोबदला न देणा-या पुरुषांसाठी दंड सांगितला आहे· याउलट मोबदला घेऊनही आजारपण इ·कारणास्तव वेश्येने संभोगास नकार दिल्यास तिला त्याबाबत

शिक्षेतून याज्ञवल्क्याने सूट दिली आहे. रखेलीच्या पालनपोषणाचा विचारही या स्मृतीने केला आहे.

स्त्री-संग्रहणाच्या या प्रकरणामध्ये समाजामध्ये स्त्रीवर अत्याचार किंवा अन्याय करणा-यांच्या प्रवृत्तीला आळा बसावा, यासाठी तिच्या रक्षणाच्या दृष्टीने उपाययोजना केली आहे. तिची व्यवस्था लावण्याच्या दृष्टीने स्मृतिकाराने किती तपशीलवार विचार केला होता हे यावरून दिसते.

यतिधर्मप्रकरणामध्ये याज्ञवल्क्याने गर्भवतीच्या दोहदपूर्तीबाबत विचार मांडला आहे. यामध्ये स्त्रीचे प्रिय करणे महत्त्वाचे नाही, तर तो गर्भ पुरुषगर्भ आहे हे गृहीत धरून अशा गर्भासाठी प्रिय करणे महत्त्वाचे समजण्यात आले आहे.

गुरुभार्यागमन हे याज्ञवल्क्याने महापातक मानले आहे. जर एखाद्या पुरुषाने निकटच्या नात्याच्या स्त्री बरोबर तिच्या संमतीने संभोग केला तर त्या स्त्रीला अशा पुरुषाच्या एवढेच प्रायश्चित्त सांगावे आणि मृत्यू ही कायदेशीर शिक्षा द्यावी असे म्हटले आहे. याप्रमाणे कठोर शिक्षेबाबत सांगणा-या याज्ञवल्क्याने ब्राह्मणास निषेधवचनावरून सोडले आहे.

याज्ञवलक्याने स्त्री वधाला उपपातक मानून त्यासाठी घ्यावयाचे प्रायश्चित्त सांगितले आहे. परंतु त्याचे स्वरूप गुन्हेगाराला सवड असे वाटते. गुरुतल्पगमनासाठी सांगितलेले तप्तशयन इ. प्रायश्चित अपराध्यासाठी अत्यंत भयंकर एकप्रकारे मृत्यूदंडच आहे. तथापि, वर्णानुसार भिन्नता सांगून एकात्मतेस बाधा आणली आहे. पतित कन्येच्या स्वीकाराबाबतचा याज्ञवल्क्याचा नियम पुरोगामी विचारसरणीचा असला तरी त्यातील अटी अयोग्य वाटतात. पतित स्त्रियांना निवारा इ. देण्याबाबतचा दृष्टिकोण सहानुभूतीचा दिसतो.

स्मार्त दर्शनामध्ये मनुस्मृती खालोखाल प्रमाण मानल्या जाणा-या याज्ञवल्क्यस्मृती मध्ये स्त्री जीवनाविषयीचे विचार पुष्कळ खुलाशाने मांडलेले दिसून येतात. स्त्रीजीवन, समस्या, स्त्रियांचे अधिकार या विषयी समाजामध्ये पुष्कळ जागृती होऊ लागली आहे. स्त्री मुक्तीच्या संघटना देखील आज कार्यरत आहेत. या पार्श्वभूमीवर याज्ञवल्क्यस्मृतीतील

स्त्री विषयक विचारांची केलेली ही चिकित्सा, स्त्री जीवनाचा विचार करणा-या स्त्रीसह सर्व घटकांना थोडया प्रमाणात का होईना, या चिकित्सेची दखल घ्यायला लावेल, असे संशोधिकेस प्रामाणिकपणे वाटते, असे झाल्यास प्रस्तुत संशोधन एका दृष्टीने उपयुक्त झाले असे समजण्यासही हरकत नाही·